**दि.२७.१०.२०२३**

**आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष २०२३ निमित्ताने कृषी विज्ञान केंद्र, धुळे येथे तृणधान्य प्रक्रिया पदार्थ प्रदर्शनी व तृणधान्य पाककला स्पर्धा मोठ्या उत्साहात संपन्न...**

महात्मा फुले कृषि विद्यापीठ कृषि विज्ञान केंद्र, धुळे, बाजरा संशोधन केंद्र, धुळे, कृषि महाविद्यालय, धुळे, कृषि तंत्र विद्यालय, धुळे, कृषि विभाग, धुळे आणि आत्मा,धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य प्रदर्शनी पाककला स्पर्धा आणि मिलेट पिक संग्रहालय शिवार फेरी यांचे आयोजन कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथे दिनांक २७/१०/२०२३ रोजी उत्साह पूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हाधिकारी, धुळे मा. श्री. अभिनव गोयल सो. यांच्याहस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा.डॉ.चिंतामणी देवकर, सहयोगी अधिष्ठाता, कृषी महाविद्यालय, धुळे हे होते तर प्रमुख उपस्थितीमध्ये श्री. कुरबान तडवी, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, धुळे, श्री.नवनाथ कोळपकर, प्रकल्प संचालक, आत्मा, धुळे, डॉ.राहुल देसले, प्राचार्य, घटक कृषी तंत्र विद्यालय धुळे, डॉ.कुशाल बार्हाटे, बाजरा पैदासकार, बाजरा संशोधन केंद्र, डॉ.दिनेश नांद्रे, कार्यक्रम समन्वयक, कृषी विज्ञान केंद्र, धुळे, प्रगतशील शेतकरी कृषिभूषण श्री. श्रीराम पाटील, कृषीभूषण श्री.प्रकाश पाटील, कृषिभूषण श्री.दिलीप पाटील सर्व विभाग प्रमुख,कृषी महाविद्यालय, धुळे, अधिकारी कर्मचारी, कृषी विभाग, आत्मा धुळे, सर्व शास्त्रज्ञ, कर्मचारी कृषी विज्ञान केद्र, धुळे, सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, कृषी तंत्र विद्यालय धुळे, सर्व अधिकारी, बाजरा संशोधन केंद्र,धुळे आदी मान्यवर उपस्थित होते, तसेच धुळे जिह्यातील सर्व शेतीशाळा विद्यार्थी, शेतकरी, महिला , बचत गट प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदर प्रदर्शनाच्या प्रास्ताविकामध्ये मार्गदर्शन करताना डॉ. राहुल देसले यांनी यांनी आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्षानिमित पौष्टिक तृणधान्य प्रदर्शनी आणि पाककला स्पर्धा यांचे महत्व व महात्मा फुले कृषी विद्यापीठ राबवीत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती उपस्थितांना दिली.

उद्घाटन पर मार्गदर्शनामध्ये मा.श्री.अभिनव गोयल यांनी आंतरराष्ट्रीय तृणधान्य वर्ष 2023 निमित्त उपस्थितांना शुभेच्छा देत सर्वांनी आपल्या दैनंदिन आहारामध्ये पौष्टिक तृणधान्याचा समावेश करण्याचे आव्हान करत कृषी विज्ञान केंद्र राबवत असलेल्या प्रत्यक्ष प्रात्यक्षिकामधून उपक्रमाचे कौतुक करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत मार्गदर्शन केले.

डॉ. चिंतामणी देवकर, सहयोगी अधिष्टता, कृषि महाविद्यालय, धुळे यांनी अध्यक्षीय मार्गदर्शन करताना विद्यापीठाच्या शिफारसीत तंत्रज्ञानाचा प्रचार व प्रसार करण्याच्या दृष्टिकोनातून कृषी विज्ञान केंद्र राबवीत असलेल्या उपक्रमाविषयी माहिती देत, पौष्टिक तृणधान्याची आहारातील गरज आणि महत्व यावर प्रकश टाकत मार्गदर्शन केले.

प्रमुख पाहुण्याच्या मार्गदर्शनामधे. श्री. कुरबान तडवी, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, धुळे यांनी कृषि विभागाच्या विविध योजना बद्दल माहिती दिली. ते पुढे म्हणाले कि, शेतकऱ्यांनी तृणधान्य पिकांचे लागवड करून कृषि विज्ञान केंद्रामध्ये त्यापासून प्रक्रियायुक्त पदार्थ बनविण्याचे प्रशिक्षण घेऊन आत्मनिर्भर होण्याचा सल्ला त्यांनी ग्रामीण युवक व युवती यांना दिला. तसेच तांत्रिक मार्गदर्शनामध्ये कृषी विज्ञान केंद्रातील शास्त्रज्ञांनी विविध विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमा प्रसंगी एकूण ३५ प्रदर्शनी दालन, ३९ पाककला स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. तसेच उपस्थित मान्यवराच्या हस्ते प्रथम तीन पारितोषिक वितरण करण्यात आले. तज्ञ परीक्षकाची जबाबदारी सौ.सुजाता पाटील, श्रीमती.स्मिता पाटील,श्रीमती.मनीषा डीएलानी यांनी पार पाडली. त्याबरोबरच धुळे जिल्ह्यातील शेती शाळेत घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेतील वीजेत्याचे हि उपस्थित मान्यवराच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

प्रदर्शनी कार्यक्रमाचे संचालन डॉ. पंकज पाटील यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ.दिनेश नांद्रे यांनी केले. या प्रदर्शनी मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी कृषी विज्ञान केंद्र, धुळे, बाजार संशोधन केंद्र, धुळे, कृषी महाविद्यालय, धुळे, कृषी तंत्र विद्यालय, धुळे येथील अधिकारी, कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले.